# मराठी (कुमारभारती)

## उत्तरे : सराव कृतिपत्रिका 1 ली

**प्र. 1. (अ)**

**(1)** (i) **वसंत ऋतूतील महिने**

- फाल्गुन
- चैत्र
- वैशाख

(ii) **चैत्राला दिलेली दोन नावे**

- वसंतात्मा
- मधुमास

**(2)** **पिंपळ व मधुमालती यांचे मनोहारी दर्शन**

- पिंपळाला अर्ध्यापर्यंत वेढून टाकणाऱ्या मधुमालतीच्या गुलाबी गेंदांनी आणि पिंपळाच्या तांबूस पानांनी वनश्री डवरलेली होती.
- मधुमालती व पिंपळ यांची हिरवी फळे दाटीवाटीने फांद्यांना लगडलेली होती.

**(3)** एकदा वसंत ऋतूत गावी जाण्याचे भाग्य आम्हांला लाभले. तिथे गेल्यावर मन मोहित होऊन गेले. शहरात जे निसर्गसौंदर्य जाणवलेले नाही, ते सौंदर्य मला इथे दिसले.

आता हे चाफ्याचे झाड पाहा. वास्तविक, त्या झाडाच्या रूपात आकर्षक म्हणावा असा एकही घटक नाही. पण तोच पांढरा चाफा फुलांनी डवरल्यावर पाहा. मन लोभावतेच. आपण नकळत वाकून जमिनीवर पडलेले फूल उचलतो. पाकळ्यांवरून हात फिरवतो. चिमूटभर हळदपूड अलगद सोडलेली असावी, तसा पिवळा रंग गाभ्यात शोभून दिसतो. गडद पिवळ्या रंगाच्या छोट्या छोट्या फुलांनी डवरलेली सुरंगी तर पाहतच राहावी. सूर्याचा प्रकाश पडताच, ती फुले पूर्ण उमलतात. सारे रान सुगंधाने भरून जाते. जिकडे पाहावे तिकडे कोवळी कोवळी हिरव्या रंगांची पाने आणि शेकडो रंगछटा लेवून बसलेली फुले! निसर्ग या विविध रंगांनीच आच्छादलेला असतो. हे मला आमच्या गावी कोकणात पाहायला मिळते.

**प्र. 1. (आ)**

**(1)** (i) झाडावरून गळून पडणारी – पिकलेली पाने

(ii) कर्णकटू आवाजाने जागे होणारे – गवतपाते

(iii) पानाने गवतपात्याला दिलेली उपमा – चिडखोर बिब्बा

(iv) संजीवक स्पर्शाने गवतपात्याला जागे करणारा – वसंतऋतू

**(2)** (i) झोपी गेलेल्या चिमुकल्या गवताच्या पात्याने गळून पडणाऱ्या पानाकडे तक्रार केली; कारण त्याची झोपमोड होऊन त्याच्या गोड गोड स्वप्नांचा चुराडा झाला होता.

(ii) 'अरसिक गवताच्या पात्याला गाणं समजणार नाही,' असे गळून पडणारे पान म्हणाले; कारण त्याने आयुष्यात गाणे म्हणण्यासाठी कधी 'आ'सुद्धा केला नव्हता.

**(3)** माणसाच्या स्वभावाची एक गंमतच आहे. आपल्या मुलाने सकाळी लवकर उठावे, व्यायाम करावा, नियमित अभ्यास करावा, त्याने चांगल्या मुलांचीच संगत धरावी, परीक्षेत जास्तीत जास्त गुण मिळवावेत... वगैरे वगैरे, असे प्रत्येक आईबाबांना वाटते. पण या आईबाबांनी त्यांच्या तरुणपणी असे काहीही केलेले नसते. त्या काळात त्यांच्या आईबाबांनी धरलेले असले आग्रह यांनी उधळून लावले होते. मात्र हे आधुनिक काळातच घडते असे नाही. जगभर सर्व मानवी समाजांत हेच घडत आलेले आहे. जन्म, बालपण, तारुण्य, वार्धक्य व नंतर मृत्यू हे चक्र अव्याहतपणे पृथ्वीच्या निर्मितीपासूनच चालू आहे. प्रत्येकजण स्वतःच्या जागेवरून जग जसे दिसते, तसे आणि तेवढेच खरे आहे, असे मानतो. म्हणून प्रत्येक पिढीत ते आणि तसेच घडत राहते.

**प्र. 1. (इ)**

**(1)** (i) स्वार्थी वृत्तीचा त्याग करणे हा आनंदी होण्याचा उपाय आहे.

(ii) जीवनात प्रत्येकाचा प्रयत्न आनंदी होण्यासाठी चालू असतो.

**(2)**

**विवेकानंदांच्या मते, आनंदी होण्यासाठी आवश्यक दोन गोष्टी –**

- अहंकाररहितता
- स्वार्थनिरपेक्षता

**प्र. 2. (अ)**

**(1)**

**कवींनी वस्तूंवर मानवी भावनांचे केलेले आरोप**

- वस्तू सुखावतात, वस्तू सेवक असतात.
- लाड करून घेतात, वस्तू मरण पावतात.

**(2)** (i) वस्तूंना जीव व मन असल्यासारखे वागवले की वस्तू प्रचंड सुखावतात.

(ii) आपल्या मानलेल्या जागेवरून त्यांना हटवणार नाही, याची वस्तूंना हमी द्यावी.

**(3)** वस्तू किती संवेदनशील असतात हे सांगताना कवी म्हणतो—कदाचित वस्तूंना प्राण नसेल, त्यांच्यात चेतना नसेल, परंतु वस्तूंना निर्जीव समजू नये. त्यांना माणसासारखा जीव असतो. त्यांना जीव नसल्यासारखे वागवू नये.

**(4)** द. भा. धामणस्कर यांनी 'वस्तू' या कवितेमध्ये वस्तूंना कसे हाताळावे व जोपासावे याचा वस्तुपाठ देताना वस्तूंचे मानवीकरण केले आहे.

बरीच माणसे वस्तूंना सजीव समजत नाहीत. त्यांनाही भावना असू शकतात, हे लक्षात घेत नाहीत. कवी म्हणतो की, त्यांनाही जीव आहे, मन आहे, असे आपण समजून त्यांच्याशी वागलो, तर वस्तूंना परमानंद होतो. वस्तूंना कसेही हाताळू नये. त्यांना एखाद्या लहान मुलांसारखे लाडावून मायेने हाताळावे. हाताळताना आपले

अस्वच्छ हात लावू नयेत. कारण वस्तूंनाही स्वच्छतेची आवड असते. महात्मा गांधींचे वचन आहे की 'स्वच्छता हा परमेश्वर आहे', म्हणून केवळ माणसाने स्वच्छ राहावे असे नाही. आपण ज्या वस्तू वापरतो, त्यांनाही स्वच्छ राखता आले पाहिजे.

'वस्तूंनाही असते आवड स्वच्छ राहण्याची' या ओळीतून माणसाला वस्तू हाताळण्याचा निकोप दृष्टिकोन दिलेला आहे.

**प्र. 2. (आ)**

**(1)**

| **आकाशी झेप घे रे** |
| --- |
| (i) कवितेचे कवी – जगदीश खेबुडकर |
| (ii) कवितेचा विषय – स्वसामर्थ्य व स्वातंत्र्य मोलाचे असते. |
| (iii) कवितेची भाषिक वैशिष्ट्ये – ध्रुपद व कडवी अशी या गीताची सुटसुटीत रचना आहे. रसाळ शब्दकळा व नेमके मर्म सांगणारी भाषा हे या कवितेचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. पिंजरा हे पारतंत्र्याचे प्रतीक, तर पंख हे मुक्तपणे आकाशात विहार करण्याचे प्रतीक. दऱ्या-डोंगर, सरिता-सागर ही सर्व अडचणींची प्रतीके. सर्वसामान्य लोकांना सहज कळतील, आशय थेट मनाला भिडेल, अशी ही सोपी, साधी प्रतीके कवींनी वापरली आहेत. 'फळ रसाळ मिळते' याप्रमाणे अनुप्रासांचा सुंदर उपयोग केलेला आहे. एकूण, ही कविता रसाळ, प्रासादिक बनली आहे. |

**(2)**

| **तू झालास मूक समाजाचा नायक** |
| --- |
| (i) कवितेचे कवी – ज. वि. पवार |
| (ii) कवितेचा विषय – डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे माहात्म्य |
| (iii) कवितेची भाषिक वैशिष्ट्ये – कविता मुक्तछंदात आहे. 'तू परिस्थितीवर स्वार झालास', 'इतिहास घडवलास', 'रणशिंग फुंकलेस', 'गुलामांच्या पायातल्या बेड्या तोडल्यास', 'आकाश हादरलं', 'पृथ्वी डचमळली', 'चवदार तळ्याला आग लागली' यांसारख्या लढवय्या शब्दप्रयोगांनी कविता ओजस्वी बनली आहे. पूर्वी दलित समाज बाबासाहेबांच्या नेतृत्वाखाली खवळून उठला होता. तथाकथित उच्चवर्णीयांमध्ये खळबळ माजली होती. हे 'चवदार तळ्याला आग लागली' या शब्दांतून प्रखरपणे व्यक्त होते. आता दलित समाज शांत झाला आहे, ही बाब 'चवदार तळ्याचे पाणी थंड झालं' या शब्दांतून व्यक्त होते. |

**प्र. 2. (इ)**

**आशयसौंदर्य :** 'उत्तमलक्षण' या श्रीदासबोधातील एका समासामध्ये समर्थ रामदासांनी गुणसंपन्न आदर्श व्यक्तिमत्त्वाची महत्त्वाची लक्षणे सांगितली आहेत. त्यांपैकी प्रस्तुत ओवीमध्ये तीन लक्षणांचा ऊहापोह केला आहे.

**काव्यसौंदर्य :** समाजात वावरताना व्यक्तीने कोणते आचरण करावे हे सांगताना संत रामदास म्हणतात–लोकांचे मन मोडू नये. लोकांनी केलेली विनंती धुडकावू नये. उलट जनभावनांचा आदर करावा. तसेच वाईट मार्गाने संपत्ती साठवू नये. अशी संपत्ती हे पापाचे धन असते. म्हणून सत्शील मार्गाने जीवन व्यतीत करावे. पुण्यमार्ग आचारावा. कधीही पुण्यमार्गाने जाण्याचे सोडू नये.

**भाषिक वैशिष्ट्ये :** वरील ओवीमध्ये जनांसाठी खूप सुगम निरूपण केले आहे. 'तोडू नये, जोडू नये, सोडू नये' अशा सोप्या यमकांद्वारे संदेशांमध्ये आवाहकता आली आहे. ओवीछंदाला साजेशी सुबोध भाषा वापरल्यामुळे जनमानसावर तत्त्व ठसवणे सुलभ झाले आहे. पापद्रव्य व पुण्यमार्ग यांतील विरोधाभास ठळकपणे उठून दिसतो. ओवीमध्ये प्रासादिकता हा गुण आढळतो.

**प्र. 3.**

**(1)** आईवरील प्रेमापोटी कोणतीही कृती करायला मधू तयार होतो. तो एका गृहस्थाचे पाकीट मारतो.

पुढे पाकिटातील चिठ्ठीवरून मधूला सत्य स्थिती कळते. आपण चोरलेल्या पैशांमुळे त्या गृहस्थाच्या आईला जीव गमवावा लागू शकतो. या विचाराने तो व्याकूळ होतो आणि पाकिटात असलेल्या पत्त्यावरून ताबडतोब पैसे परत करण्याचा तो निर्णय घेतो. त्याची ही कृती त्याच्या संवेदनशील मनाचे उदाहरण आहे. आपल्या कृतीमुळे कोणाचातरी मृत्यू ओढवणे हा क्रूरपणाच होय, ते त्याला जाणवते. आपली जशी आई आहे, तशीच दुसऱ्या व्यक्तीलासुद्धा आई असते. त्या व्यक्तीलासुद्धा स्वतःच्या आईविषयी प्रेम असणारच. आपण स्वार्थाने आंधळे होऊन फक्त स्वतःच्या आईवरील प्रेम लक्षात घेतो; दुसऱ्याच्या मनाचा विचारच करीत नाही, हे मधूच्या लक्षात येते. यातून त्याची तीव्र संवेदनशीलता प्रत्ययाला येते.

**(2)** लेफ्टनंट स्वाती महाडिक यांची जिद्द त्यांच्या निर्धारातून व त्या निर्धाराच्या पूर्तीमधून दिसते. पतीचे अंत्यविधी चालू होते, त्याच वेळी स्वाती यांच्या मनात त्यांचा निर्णय पक्का झाला. त्या वेळी त्या सैन्यात दाखल होण्याच्या वयाच्या अटीत बसत नव्हत्या. तरीही अर्ज-विनंत्या करून त्यांनी वयाची अट शिथिल करून घेतली. स्टेट सिलेक्शन बोर्डाची परीक्षा खूप कठीण असते. खूप कष्ट घेऊन त्यांनी ती परीक्षा यशस्वी रितीने पार केली. त्यानंतरचे चेन्नई येथील ऑफिसर्स ट्रेनिंग ॲकॅडमीचे अत्यंत कष्टमय असे प्रशिक्षण यशस्वी रितीने पूर्ण केले. लेफ्टनंट म्हणून त्या सैन्यदलात दाखल झाल्या. कर्तबगारीने खांद्यावर अभिमानाचे दोन स्टार मिळवले. पतीचे स्वप्न नष्ट होऊ दिले नाही. एक सर्वसाधारण स्त्री समाजाला ललामभूत ठरली. हे सर्व त्यांच्या जिद्दी स्वभावामुळे घडू शकले.

**(3)** चुका करणाऱ्या माणसांकडे व मुलांकडे समाज, पोलीस नकारात्मक दृष्टीने पाहतात. पोलीससुद्धा अशी मुले समोर आली की, त्यांच्याकडून माहिती मिळवण्यासाठी पहिल्यांदा त्यांना मारपीट करतात. ही मुले गुन्हेगारी स्वरूपाचीच असतात, असा पोलिसांनी पूर्वग्रह करून घेतलेला असतो. साहजिकच, या मुलांचा सुधारण्याचा मार्गच बंद होतो. श्रीमती रेखा यांनी मात्र आईच्या मायेने अशा मुलांकडे पाहिले. त्यांना जवळ घेतले. आपलेसे केले. त्यामुळे ही मुले पुन्हा घरी जाण्यास राजी झाली. चांगले आयुष्य सुरू करण्याची त्यांना संधी मिळाली. पहिल्याच केसमध्ये त्यांना सापडलेल्या १४ वर्षांच्या मुलाचे त्यांनी ममतेने मन परिवर्तन केले. पोलिसी बडगा दाखवण्यापेक्षा त्यांनी त्यांच्याशी मैत्री केली. यामुळे ही मुले रेखाजींच्या जवळ आली. याचा अर्थच असा की, मुलांशी प्रेमाने वागले तर ती स्वगृही जाण्यास तयार होतात.

**प्र. 4. (अ)**

**(1)**

| सामासिक शब्द | समासाचे नाव |
|---|---|
| (i) विद्याधन | – कर्मधारय |
| (ii) अष्टकोन | – द्विगू |

**(2)** (1) (i) महत् – महत्त्व (ii) प्रौढ – प्रौढत्व

(2) (i) अधून – अधूनमधून (ii) दंगा – दंगामस्ती

**(3)** (i) विसंगत वाटणे – **अर्थ :** विरोध जाणवणे, सुसंगत नसणे.

**वाक्य :** सदाशिवभाऊंचे बोलणे व वागणे यांत विसंगती वाटते.

(ii) नजरेत भरणे – **अर्थ :** लक्ष वेधणे.

**वाक्य :** सर्व चित्रांमध्ये मीनाक्षीने काढलेले चित्र नजरेत भरले.

(iii) कित्ता गिरवणे – **अर्थ :** सराव करणे.

**वाक्य :** महेशने वडिलांच्या करारी स्वभावाचा कित्ता गिरवला.

(iv) तोंडसुख घेणे – **अर्थ :** खूप बडबडणे.

**वाक्य :** शेजारच्या सखूवर करुणा मावशींनी तोंडसुख घेतले.

**प्र. 4. (आ)**

**(1)** (1) (i) कर्ण = कान (ii) पृथ्वी = अवनी

(2) (i) जुनी × नवी (ii) सुंदर × कुरूप

(3) (i) कथा – कथा (ii) तोंड – तोंडे

(4) लांबलचक – बल कल

**(2)** (i) आधुनिक

(ii) दीपावली

(iii) परीक्षा

(iv) निर्जीव

(v) हार्दिक

(vi) पुरस्कार

**(3)** (i) ? – प्रश्नचिन्ह (ii) ! – उद्गारचिन्ह

**(4)** (i) Drama – नाटक (ii) Tax – कर

**प्र. 5. (अ), (आ) व (इ)...**

**उपयोजित लेखनातील कृतींच्या स्वयं-मूल्यमापनाबाबत...**

उपयोजित लेखनाच्या कृतींमध्ये विद्यार्थ्यांनी उत्तर लिहिताना स्वत:चे विचार, स्वत:च्या कल्पना स्वभाषेत लिहाव्यात, अशी अपेक्षा आहे. या कृतींची उत्तरे मुक्तोत्तरी स्वरूपाची असतात. विद्यार्थ्यांनी यांची उत्तरे स्वत: लिहावीत.

या विषयातील सोडवून दिलेल्या पहिल्या कृतिपत्रिकेतील उपयोजित लेखनामधील कृतींची उत्तरे विद्यार्थ्यांनी अभ्यासावीत; गुणदानपद्धतीतील मुद्दे विचारात घ्यावेत आणि स्वत: लिहिलेले उत्तर स्वत:च तपासण्याचा प्रयत्न करावा. गरजेनुसार आपल्या शिक्षकांचे मार्गदर्शनही घ्यावे.

उपयोजित लेखनाच्या अधिक अभ्यासासाठी **'नवनीत मराठी प्रथम भाषा उपयोजित लेखन : इयत्ता दहावी'** या पुस्तकात दिलेले उपयोजित लेखनाचे नमुने अवश्य वाचावेत.